# पुणेकर माझा

▪ वर्ष ३ रे ▪ अंक ४७ वा ▪ पुणे, मंगळवार, दि. २४ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०२४ ▪ DECL. NO.: MAHMAR51353 ▪ किंमत : ४ रुपये ▪ पाने : ४


# दिल्लीच्या मुख्यमंत्री आतिशी मार्लेना

## *कोण आहेत आतिशी मार्लेना?*



*आतिशी या आम आदमी पार्टीमधील वरिष्ठ नेत्या व सामाजिक कार्यकर्त्या म्हणून परिचित आहेत. त्यांनी सामाजिक कार्यकर्ता म्हणून त्यांच्या सार्वजनिक जीवनाला सुरुवात केली होती. २०१३ मध्ये ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या नेतृत्वाखाली सुरु झालेल्या भ्रष्टाचाराविरोधातील आंदोलनात त्या सहभागी झाल्या होत्या. सध्याच्या आम आदमी पार्टीतील बहुसंख्य नेते हे त्या आंदोलनात सहभागी झाले होते. त्याचदरम्यान, आतिशी या केजरीवाल व इतर नेत्यांच्या संपर्कात आल्या. पुढे त्यांनी आम आदमी पार्टीद्वारे राजकीय कारकिर्दीला सुरुवात केली. त्या दिल्लीतल्या कालकाजी विधानसभा मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून आल्या आहेत. त्यांनी दिल्लीच्या शिक्षण मंत्रालयासह, सार्वजनिक बांधकाम आणि पर्यटन मंत्री म्हणून देखील काम केलं आहे. त्या आम आदमी पार्टीच्या संस्थापक सदस्य देखील आहेत.*

नवी दिल्ली : दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देण्याची घोषणा केल्यानंतर दिल्लीच्या राजकारणात मोठी चर्चा रंगली. त्यामुळे दिल्लीचा पुढचा मुख्यमंत्री कोण असणार? याबाबत उत्सुकता निर्माण झाली होती. तसेच मुख्यमंत्रिपदासाठी अनेकांची नावेही चर्चेत होती. मात्र, अखेर दिल्लीच्या मुख्यमंत्री म्हणून आतिशी मार्लेना यांची आम आदमी पार्टीने एकमताने निवड केली. या निवडीनंतर अरविंद केजरीवाल यांनी आज (१७ सप्टेंबर) मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा उपराज्यपालांकडे सुपूर्द केला आहे. आता पुढील दोन ते तीन दिवसांमध्ये आतिशी मार्लेना या मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतील. आम आदमी पक्षाने एकमताने दिल्लीच्या मुख्यमंत्री म्हणून निवड केल्यानंतर आतिशी मार्लेना यांनी पहिली प्रतिक्रिया दिली आहे. यावेळी त्यांनी अरविंद केजरीवाल यांच्यासह आम आदमी पक्षाचे आभार मानले आहेत. तसेच एवढी मोठी जबाबदारी पक्षाने सोपवल्याबद्दल त्यांनी आभार व्यक्त केले आहेत. अरविंद केजरीवाल यांनी ही जबाबदारी सोपविण्याचा निर्णय घेतला. याचा मला आनंद आहे, पण दुःख देखील आहे, कारण केजरीवाल हे त्यांच्या पदाचा राजीनामा देत आहेत. पण दिल्लीचे एकच मुख्यमंत्री आहेत, ते म्हणजे अरविंद केजरीवाल, असं आतिशी मार्लेना यांनी म्हटलं आहे.

मी सर्वात आधी दिल्लीचे लोकप्रिय मुख्यमंत्री आणि आप आदमी पक्षाचे राष्ट्रीय संयोजक तसेच माझे गुरु अरविंद केजरीवाल यांचे आभार मानते. त्यांनी मला इतकी मोठी जबाबदारी दिली आणि त्यासाठी माझ्यावर विश्वास ठेवला. हे फक्त 'आप' मध्येच होऊ शकतं. मी एका सामान्य कुटुंबातून आलेली आहे. कदाचित मला निवडणुकीचे तिकीटही मिळाले नसते. मात्र, अरविंद केजरीवाल यांनी माझ्यावर विश्वास ठेवला, मला आमदार, मंत्री बनवलं आणि माझ्यावर अरविंद केजरीवाल यांनी आता ही मोठी जबाबदारी सोपविण्याचा निर्णय घेतला. याचा मला आनंद आहे. पण मी दुःखी देखील आहे, कारण दिल्लीचे मुख्यमंत्री आणि माझे मोठे भाऊ अरविंद केजरीवाल हे त्यांच्या पदाचा राजीनामा देत आहेत. आज सर्व आम आदमी पक्षाचे आमदार आणि दिल्लीच्या दोन कोटी जनतेच्यावतीने मी सांगू इच्छिते की दिल्लीचे एकच मुख्यमंत्री आहेत, ते म्हणजे अरविंद केजरीवाल, अशी प्रतिक्रिया आतिशी यांनी दिली आहे.

## भाजपाच्या आमदार अश्विनी जगताप शरद पवार गटात जाणार ?



पिंपरी : भाजपाच्या आमदार अश्विनी लक्ष्मण जगताप या शरद पवार गटात जाणार असल्याची जोरदार चर्चा सुरू होती. अखेर या चर्चेला अश्विनी जगताप यांनी पूर्णविराम दिला आहे. मी कुठल्याही पक्षात जाणार नाही. शरद पवार यांची मी भेट घेतलेली नाही. कुणीतरी मुद्दामहून अशा बातम्या पसरवत असल्याचा आरोप अश्विनी जगताप यांनी केला. त्या पिंपरी-चिंचवडमध्ये प्रसार माध्यमांशी बोलत होत्या. अश्विनी लक्ष्मण जगताप म्हणाल्या, माझ्या विरोधात कुणीतरी चुकीच्या बातम्या पसरवत आहे. मी शरद पवार यांना भेटलेले नाही. त्यांच्या पक्षात प्रवेश करणार नाही. आम्ही सर्व निष्ठावंत कार्यकर्ते आहोत. दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनी निष्ठा काय असते हे आजारपणात दाखवून दिलेले आहे. त्यामुळे मी पक्ष सोडणार या सर्व गोष्टी निरर्थक आहेत. पुढे त्या म्हणाल्या, आमच्या कुटुंबात कुठलाही वाद नाही. त्यामुळे पक्ष ज्याला उमेदवारी देईल मी त्याचं काम करेल. अनेक जण आम्हाला सोडून जात असले तरी आमच्यात कुठलीही गटबाजी नाही. निष्ठावंत कार्यकर्ता आमच्या सोबत असल्याचे मत देखील अश्विनी जगताप यांनी व्यक्त केलं. नाना काटे यांनी चिंचवड विधानसभेसाठी इच्छुक असल्याचं म्हटलं असलं तरी पक्षश्रेष्ठी यावर निर्णय घेईल. काटे यांचं आव्हान असेल असे मला वाटत नाही, असं देखील अश्विनी जगताप यांनी अधोरेखित केलं.

## मुंबई-दिल्ली महामार्ग उंदरामुळे खचला




दिल्ली : मुंबई-दिल्ली महामार्ग खचला असून अनेक वाहनांचा अपघात झाला आहे. हा महामार्ग बांधणाऱ्या कंपनीच्या कर्मचाऱ्याने रस्ता खचल्याबद्दल उंदरांना जबाबदार धरले होते. केसीसी बिल्डकॉन या कंपनीचा कनिष्ठ कर्मचारी असलेल्या एका कर्मचाऱ्याने सांगितले होते की, उंदरांमुळे महामार्ग खचला. या विधानामुळे वाद निर्माण झाल्यानंतर आता कंपनीने सदर कर्मचाऱ्याची हकालपट्टी केली आहे. हकालपट्टी केलेल्या कर्मचाऱ्याला महामार्गाच्या बांधणीचे कोणतेही तांत्रिक ज्ञान नव्हते. त्याने केलेली टिप्पणी अतिशय चुकीची होती, त्यामुळे त्याला काढून टाकण्यात आले असल्याचे कंपनीने आपल्या निवेदनात सांगितले. तसेच हा कर्मचारी मेन्टेनन्स व्यवस्थापक नव्हता, असेही कंपनीने स्पष्ट केले आहे. उंदीर किंवा छोट्या प्राण्याने हा खड्डा केला असावा. ज्यामुळे पाणी झिरपून मोठा खड्डा पडला असावा, अशी टिप्पणी या कर्मचाऱ्याने केली होती.

दरम्यान या प्रकल्पाचे दौसा येथील संचालक बलवीर यादव यांनी सांगितले की, पाणी झिरपल्यामुळे हा खड्डा पडला असावा. रस्त्यावर खड्डा पडल्याची माहिती मिळाल्यानंतर कंत्राटदाराने लगेच खड्ड्याच्या ठिकाणी बॅरिकेड लावले. तसेच खड्डाही तात्काळ भरण्यात आला, अशी माहिती यादव यांनी दिली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २ ऑक्टोबर २०२३ रोजी या महामार्गाच्या दुसऱ्या टप्प्याचे अनावरण केले होते. या दुसऱ्या टप्प्यात राजस्थानमधील ३७३ किमी, मध्यप्रदेशमधील २४४ किमी आणि हरियाणामधील ७९ किमी टप्प्याचे अनावरण झाले होते. तर सोहना-दौसा हा टप्पा आधीपासूनच कार्यरत होता.

मुंबई-दिल्ली महामार्ग १,३८६ किमतींचा असून भारतातील सर्वात मोठा महामार्ग आहे. महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश, राजस्थान आणि हरियाणा या राज्यातून हा महामार्ग जातो.

## चांद्रयान आणि मंगळयान मोहिमेनंतर भारताचं नवं उड्डाण! व्हिनस मिशनला कॅबिनेटची मंजुरी



नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या कॅबिनेटने आज शुक्रयान व्हिनस ऑर्बिटर मिशनला मंजुरी दिली. चांद्रयान आणि मंगळयान या मोहिमानंतर आता शुक्रवार स्वारी केली जाईल. शुक्र हा पृथ्वीच्या सर्वात जवळचा असलेला ग्रह आहे. या मोहिमेद्वारे शुक्र या ग्रहाचा अभ्यास केला जाणार आहे. या अभ्यासाद्वारे शुक्र ग्रहाबाबत माहिती मिळू शकणार आहे. ही मोहीम शुक्राच्या अभ्यासासाठी महत्त्वाची असणार आहे.

**या मोहीमेची वैशिष्ट्यं काय?**

Venus OAbiteA Misson साठी एक खास अंतराळयान तयार केलं जाईल. हे अंतराळयान शुक्राच्या कक्षेत फिरुन त्याचा अभ्यास करणार आहे. शुक्र ग्रहावर काय स्थिती आहे. त्याचे चंद्र कुठले?

सूर्याचा शुक्रावर कसा प्रभाव पडतो? असं सांगितलं जातं की शुक्र हा मानवी वस्तीसाठी योग्य असा ग्रह होता. मात्र नंतर इथली स्थिती बदलली. ती कशी बदलली त्याचाही अभ्यास या मोहिमेत केला जाणार आहे.

Venus OAbiteA Misson साठीचं स्पेसक्राफ्ट तयार करणं आणि ते लाँच करणं याची जबाबदारी ISRO ची असणार आहे. ही मोहीम २०२८ मध्ये लाँच केली जाईल अशी चर्चा आहे. या योजनेसाठी १२३६ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. शुक्रयान स्पेस क्राफ्टसाठी यातले ८२४ कोटी रुपये खर्च होणार आहेत.

**शुक्रयानाबाबत काय म्हणाले होते इस्रोचे प्रमुख?**

इस्रोचे प्रमुख डॉ. एस सोमनाथ म्हणाले शुक्र हा अंतराळातील महत्त्वाचा ग्रह आहे. त्याचा ॲसिडिक गुणधर्म कसा आहे? हे तपासण्यासाठी मोहीम आवश्यक आहे. शुक्र ग्रहावर वायमंडळीय दबाव पृथ्वीपेक्षा १०० पटींनी जास्त आहे. अशी माहिती सोमनाथ यांनी मागील वर्षी दिली होती.

शुक्रयानाचं वजन २५०० किलो असणार आहे. त्यामध्ये १०० किलोंचे पेलोड्स असतील. या शुक्रयानात जर्मनी, स्वीडन, फ्रान्स, रशिया यांचेही पेलोड्स असण्याची शक्यता आहे. या शुक्रयानाचं आयुष्य चार वर्षांचं असेल. शुक्रयान GSLV MaAk II या रॉकेटने हे यान लाँच केलं जाईल अशी शक्यता आहे. शुक्रयान अंतराळात गेल्यानंतर शुक्र ग्रहाची संरचना, ज्वालामुखीचं प्रमाण तिथे आहे का? असल्यास ते कसं आहे? शुक्राच्या पृष्ठभागावर असलेला गॅस, त्याचं उत्सर्जन, हवेची गती, ढगांची गती या सगळ्याचा अभ्यास करणार आहे. शुक्रयान शुक्राच्या अंडाकार कक्षेत चारही बाजूनी चक्कर लगावणार आहे.

## संपादकीय...


# भाजपचे हरियाणातील 'काँग्रेसी वळण'

शिस्तप्रिय पक्ष अशी प्रतिमा भाजपने जपली, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांच्याकडे पक्षाचे नेतृत्व आल्यापासून पक्षातील शिस्त अधिकच कडक झाली. नेतृत्वाच्या विरोधात बोलणे सोडा, खासगीतही मतप्रदर्शन करण्याची कोणाची टाप राहिली नाही. मुख्यमंत्री किंवा मंत्रीपदावरून रातोरात हटविण्यात आले तरी 'हू' की 'चू' करण्याची हिम्मत कोणी दाखवली नाही. मोदी-शहा यांच्या गुजरातमध्ये विजय रुपाणी यांच्यासह सर्व मंत्रिमंडळाला नारळ देण्यात आला, कोणत्याही मंत्र्याचा नवीन मुख्यमंत्र्यांच्या मंत्रिमंडळात फेरसमावेश झाला नाही. नितीन पटेल यांच्यासारख्या ज्येष्ठ मंत्र्यालाही घरी बसविण्यात आले. पण कोणीही नेतृत्वाच्या निर्णयाच्या विरोधात प्रतिक्रिया व्यक्त करण्याचे धाडस केले नाही. जमिनीच्या कथित गैरव्यवहारावरून एकनाथ खडसे यांचा मंत्रीपदाचा राजीनामा घेण्यात आला. त्यानंतर खडसे यांनी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विरोधात तोफ डागली; पण त्याची किंमत खडसे यांना आजही चुकवावी लागत आहे. खडसेंचे जावई 'ईडी'चा पाहुणचार घेऊन आले. उत्तराखंडमध्ये सहा महिन्यांत तीन मुख्यमंत्री बदलले पण कोणी काही विरोधी भूमिका घेतली नाही. राजस्थानमध्ये वसुंधराराजे यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्याला मुख्यमंत्रीपद नाकारले तरीही त्यांनीही केंद्रीय नेतृत्वाबद्दल उघडपणे नाराजी व्यक्त केली नव्हती. मोदी-शहा यांची जरबच तेवढी होती. एवढी शिस्त असूनही लोकसभा निवडणुकीत भाजपच्या खासदारांचे संख्याबळ ६३ने घटले. भाजपची गाडी २४०पर्यंत अडकल्याने राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील मित्रपक्षांवर सारी भिस्त आली. भाजपचा जनाधार आटला तसा पक्षातील नेतृत्वाचा धाकही कमी झाला की काय, अशी शंका घेण्यासारखे प्रसंग हरियाणात घडत आहेत. हरियाणा विधानसभा निवडणुकीचे वारे सध्या वाहात आहेत. भाजपपुढे सत्ता कायम राखण्याचे कडवे आव्हान उभे ठाकले आहे. लोकांची सरकारबद्दलची नाराजी वाढल्यानेच लोकसभा निवडणुकीपूर्वी मनोहरलाल खट्टर यांना मुख्यमंत्रीपदावरून हटवून नायबसिंह सैनी यांची मुख्यमंत्रीपदी निवड केली. 'विधानसभा निवडणुकीत सैनी यांचाच चेहरा मुख्यमंत्रीपदासाठी असेल,' असे पक्षाच्या केंद्रीय नेतृत्वाने जाहीर केले. सहा महिने झाले तरी सैनी अजूनही स्थिरस्थावर होऊ शकलेले नाहीत. भाजपच्या अडचणींमध्ये वाढ झाली असतानाच हरियाणा भाजपमधील ज्येष्ठ नेते अनिल विज यांनी थेट मुख्यमंत्रीपदावर दावा केला आहे. विज हे एकमेव नव्हेत. केंद्रीय मंत्री राव इंद्रजीतसिंह यांनीही उघडपणे मुख्यमंत्रीपदाची इच्छा व्यक्त केली आहे. भाजपच्या मोदी - शहांच्या कारकीर्दीत प्रथमच पक्षातील कोणी नेत्याने उघडपणे मुख्यमंत्रीपदावर दावा केला आहे. यापैकी राव इंद्रजीतसिंह हे काँग्रेसमधून भाजपवासी झाल्याने त्यांच्या अंगी काँग्रेस संस्कृती कदाचित कायम असावी. पण विज तर मूळचे भाजपचे. भाजपचे सर्वात ज्येष्ठ आमदार. २०१४ मध्ये भाजपला सत्ता मिळाली तेव्हाच अनिल विज यांचे नाव मुख्यमंत्रीपदासाठी घेतले जात होते. पण गेली दहा वर्षे त्यांना पक्षात दुय्यम भूमिकेत वावरावे लागले. गृहसारखी महत्त्वाची खाती भूषवताना विज नेहमीच वादात राहिले. विक्षिप्त स्वभावाच्या विज यांनी आपल्या विधानांवरूनही पक्षाला अडचणीत आणले होते. सैनी यांची मुख्यमंत्रीपदावर निवड होतानाही विज यांनी आक्षेप घेतला होता. यामुळेच बहुधा मंत्रिमंडळात त्यांना स्थान देण्यात आले नव्हते. पण आता 'मला मुख्यमंत्री करण्यासाठी भाजपला मत द्या' असा प्रचारच केंद्रीय नेतृत्वाला डावलून विज यांनी आरंभला आहे. याआधी जम्मू आणि काश्मीरमध्ये, जाहीर केलेली उमेदवारांची यादी काही तासांतच मागे घेण्याची नामुष्की भाजपवर आली होती. हेदेखील थेट नेतृत्वालाच आव्हान होते. येडियुरप्पा किंवा वसुंधराराजे यांच्यासारख्या दिग्गजांचा पद्धतशी रपणे काटा काढणाऱ्या भाजपच्या शीर्षस्थ नेतृत्वाला हरियाणा किंवा जम्मू आणि काश्मीरमध्ये आव्हान मिळते आहे. भाजपचे हे काँग्रेसीकरण तर नाही ना? नेतृत्वाची जरब कमी झाली असावी वा नेतेमंडळींची हिम्मत वाढली असावी. काँग्रेसप्रमाणे भाजपच्या मुख्यालयात समर्थकांकरवी कोणी झिंदाबादचे नारे दिले नाहीत वा नेतृत्वासमोर शक्तिप्रदर्शन केले नाही. पण भाजपमध्ये आतापर्यंत दबला गेलेला आवाज हळूहळू बाहेर पडू लागला आहे.

'पुणेकर माझा' हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री. संतोष कचरू शिंदे यांनी श्री समर्थ एंटरप्रायजेस, शॉप नं. १, बेसमेंट, वर्तक अपार्टमेंट, ४९९, शनिवार पेठ, पुणे ४११०३० (महाराष्ट्र) येथे छापून एअरपोर्ट रोड, सर्व्हे नं. ८, यशवंतननगर, येरवडा, पुणे ४११ ००६ (एमएस) येथे प्रसिद्ध केले. प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वादविवाद पुणे न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील. संपादक : श्री. संतोष कचरू शिंदे

This Weekly Newspaper written by owner, publisher, editor - Santosh Kachru Shinde. Printed at Samarth Enterprises, Shop No. 1, Basment, Vartak Apartment, 499, Shanivar Peth, Pune 411 030. published Airport Road, Survey No. 8, Yashwantnagar, Yerwada, Pune 411 006 (MS) Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Pune Court.

# जगण्याचा अधिकार !




आपल्या संविधानाच्या मसुद्यात कलम २१ मध्ये 'कायद्याद्वारे प्रस्थापित केलेली कार्यपद्धती' हे शब्द वापरायचे की 'उचित कायदेशीर प्रक्रिया' असे म्हणायचे, यावर मोठा खल झाला. काय होती ती सगळी चर्चा? भारतीय संविधानातील अत्यंत कळीच्या मानल्या गेलेल्या कलमांत अनुच्छेद २१ चा समावेश होतो. जगण्याचा आणि व्यक्तिगत स्वातंत्र्याचा मूलभूत अधिकार त्यात आहे. मूलभूत अधिकार सल्लागार समितीने संविधानसभेत अहवाल मांडेपर्यंत सहमतीत असलेला हा मुद्दा २१ फेब्रुवारी १९४८ च्या मसुदा संविधानात (अनुच्छेद १५ म्हणून) आला आणि जोरदार वादंग सुरू झाला. कारण या अनुच्छेदाची शब्दावली. त्यात असलेले 'कायद्याद्वारे प्रस्थापित केलेली कार्यपद्धती' हे शब्द तसेच ठेवावेत की त्या जागी 'उचित कायदेशीर प्रक्रिया' असे नोंदवावे? व्यक्तीचे जीवित व व्यक्तिगत स्वातंत्र्य हिरावून घेताना सरकारच्या कारवाईचा आधार या दोहोंपैकी काय असावा, हा मुद्दा होता. या दोहोंतील फरक संक्षेपाने सांगायचा तर कायद्याने प्रस्थापित केलेली कार्यपद्धती म्हणजे न्यायालयाने निर्णय देताना कायद्यात ठरलेली प्रक्रिया अनुसरली आहे की नाही, एवढेच पाहावे; तर उचित कायदेशीर प्रक्रिया याचा अर्थ कायद्याने ठरलेली प्रक्रिया तपासताना कायद्याचा मूळ आशय, हेतू योग्य आहे का, याचेही परीक्षण न्यायालयाने करायचे.

१३ डिसेंबर १९४६ रोजी पं. जवाहरलाल नेहरू यांनी संविधानसभेत उद्दिष्टांचा ठराव मांडला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १७ डिसेंबर १९४६ रोजी त्यावरील चर्चेत भाग घेतला. या ठरावात अधिकारांच्या हननाविरोधात काहीही उपाययोजना नसल्याचे नोंदवून ते म्हणाले- ''कायद्याच्या उचित प्रक्रियेशिवाय कोणत्याही माणसाचे जीवन, स्वातंत्र्य आणि मालमत्ता काढून घेतली जाणार नाही, या नेहमीच्या सूत्रालाही या ठरावात स्थान नाही.'' डॉ. आंबेडकरांचा समावेश असलेल्या जे. बी. कृपलानी यांच्या अध्यक्षतेखालील मूलभूत अधिकार सल्लागार उपसमितीच्या १६ एप्रिल १९४७ च्या अहवालात खंड १२ मध्ये 'कायद्याची उचित प्रक्रिया' या सूत्राची नोंद आहे. याबाबत सार्वत्रिक सहमती आहे. वादातील दुसरा पर्याय अजून पुढे आलेला नाही. तो येतो मसुदा संविधानात. 'कायद्याद्वारे प्रस्थापित केलेली कार्यपद्धती अनुसरल्याखेरीज कोणत्याही व्यक्तीस, तिचे जीवित किंवा व्यक्तिगत स्वातंत्र्य यापासून वंचित केले जाणार नाही' ही त्यातील शब्दयोजना.

एक कारण अमेरिका. अमेरिकेत १४ व्या घटनादुरुस्तीने कायद्याची उचित प्रक्रिया हे तत्त्व स्वीकारले होते. किती तास काम करावे याबद्दलचे कायदे अमेरिकेत होते. मात्र मालक आणि कामगार यांच्यातील करार हा वैयक्तिक स्वातंत्र्याचा भाग असल्याने त्या दोहोंना मान्य असतील त्याप्रमाणे कामाचे तास ठरतील, असा निर्णय तेथील सर्वोच्च न्यायालयाने एका खटल्यात दिला. असे प्रकार वाढू लागले. त्यामुळे सामाजिक-आर्थिक हिताचे कायदे असंवैधानिक ठरण्याची स्थिती तिथे उद्भवली.

आपल्या संविधानसभेचे सल्लागार बी. एन. राव भारताच्या घटनेच्या दृष्टीने जगातील विविध घटनांचा अभ्यास करत होते. तज्ज्ञांना भेटत होते. या क्रमात भेटलेल्या अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती फेलिक्स फ्रँकफर्टर यांनी त्यांना 'उचित कायदेशीर प्रक्रिये'विषयी प्रतिकूल मत दिले. त्यांच्या मते ही पद्धत लोकशाहीविरोधी आहे. जनतेच्या प्रतिनिधींनी केलेले कायदे निरस्त करण्याची ताकद काही थोडया न्यायाधीशांना यातून मिळते. नुकत्याच स्वतंत्र झालेल्या, विविध समाजविभागांत अस्वस्थता असलेल्या भारताची घडी बसवताना न्यायाधीशांसारख्या लोकप्रतिनिधी नसणाऱ्या घटकांना कायदे रद्द करण्याची शक्ती मिळता कामा नये, या विचाराकडे राव तसेच आपल्या प्रमुख नेत्यांचा कल होऊ लागला. परिणामी, आपल्या संविधानाच्या मसुद्यात 'उचित कायदेशीर प्रक्रिये'ऐवजी 'कायद्याद्वारे प्रस्थापित केलेली कार्यपद्धती' स्थापित झाली. मात्र याबद्दल अनेक नेते सहमतीत नव्हते. याचे प्रत्यंतर संविधानसभेतील चर्चांतून येते. दोन्ही बाबी आपण घ्याव्यात, असे बहुतेकांचे म्हणणे होते. ६ डिसेंबर १९४८ रोजीच्या चर्चेत काझी सय्यद करिमुद्दिन यांनी राजकीय पक्षांना लोकांच्या मूलभूत अधिकारांवर अतिक्रमण करण्याचा अधिकार यातून मिळता कामा नये, असे मत मांडले. मेहबूब अली बेग बहादूर यांनी यामुळे कोणालाही राजकीय कारणांनी अटकेत टाकणे सरकारला सहज शक्य होईल, अशी भीती व्यक्त केली. राजकीय हितसंबंधांमुळे विधिमंडळाने एखादा हानीकारक कायदा केला तर किमान न्यायालय या जुलमापासून आपले रक्षण करेल, असे मत नव्या प्रस्तावाला विरोध करताना पं. ठाकूरदास भार्गव यांनी मांडले. आणखी अनेक सदस्यांनी विरोधात भाषणे केली. त्यातले एक प्रमुख नाव म्हणजे के. एम. मुन्शी. ते म्हणाले - ''न्यायालयाने केवळ कायदा आणि त्यात निहित प्रक्रियेला अनुसरून शिक्षेचे परीक्षण करणे पुरेसे नाही. संबंधित प्रकरणाची स्थिती लक्षात घेऊन त्या कायद्याचा आशय उचित व न्याय्य आहे की नाही, हेही तपासायला हवे. आपण एक लोकशाही देश स्थापित करत आहोत, हे सभागृहात वारंवार बोलले गेले आहे. व्यक्तिगत स्वातंत्र्य आणि सामाजिक नियंत्रण या दोहोंत संतुलन राखणे हे लोकशाहीचे वैशिष्ट्य आहे.'' अल्लादि कृष्णस्वामी अय्यर यांनी प्रस्तावाचे जोरदार समर्थन केले. आदर्श म्हणून अमेरिकेकडे पाहणाऱ्या विरोधकांचा प्रतिवाद करताना अमेरिकेतील नकारात्मक अनुभवांची त्यांनी जंत्री दिली. तेथील वकिलांनी वैयक्तिक स्वातंत्र्याच्या मुद्दयाचा सोयीस्कर अर्थ लावून संपत्ती रक्षणाच्या अधिकाराच्या नावाखाली बडया कंपन्या, मोठया विश्वस्त संस्था यांचीच बाजू कशी लावून धरली, हे स्पष्ट केले. कायदेविषयक व्यवसायात असलेल्या आणि अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालांचा सखोल अभ्यास असलेल्या सदस्यांनी तिथल्या उचित कायदेशीर प्रक्रियेबाबतच्या भाष्यांत संगती असल्याचे दाखवून द्यावे, असे थेट आव्हानच अय्यरांनी या वेळी दिले. चर्चेचा उर्वरित भाग १३ डिसेंबर १९४८ रोजी सुरू झाला. सदस्यांमधील टोकाची मते लक्षात घेऊन सभागृहाच्या बाहेर समझोता होण्यासाठी आठवडाभराचा वेळ दिला गेला होता. त्याचा उल्लेख उपाध्यक्षांनी केला आणि असा समझोता झालेला नसेल तर डॉ. आंबेडकरांनी एकूण चर्चेला उत्तर द्यावे अशी सूचना केली. डॉ. आंबेडकरांनी दिलेल्या उत्तरातील शेवटचा भाग असा.. ''कोणत्याही निश्चित निष्कर्षांवर येणे फार कठीण आहे. दोन्ही बाजूंनी धोके आहेत. व्यक्तीचे जीवन आणि स्वातंत्र्य यांचे रक्षण करणारी काही विशेष मूलभूत तत्त्वे निरस्त करणारे नियम कायदेमंडळात बसलेले पक्षाचे लोक करतील ही शक्यता मी पूर्णत: डावलू शकत नाही. त्याच वेळी स्वत:चा विवेक किंवा पक्षपातीपणा किंवा पूर्वग्रह असलेले सर्वोच्च न्यायालयातील पाच-सहा सज्जन कायदेमंडळाने बनवलेले कोणते कायदे चांगले आहेत आणि कोणते वाईट आहेत, याचा निर्णय करतील यावर विश्वास ठेवता येत नाही. इकडे आड तिकडे विहीर अशी ही स्थिती आहे. त्यामुळे मी काही बोलणार नाही. याबाबतचा निर्णय मी सभागृहावरच सोडतो.'' डॉ. आंबेडकरांच्या उत्तरानंतर उपाध्यक्षांनी दुरुस्त्या मताला टाकल्या. त्या सगळया फेटाळल्या गेल्या. याचा अर्थ विरोधी भाषणे अधिक होऊनही मूळ प्रस्ताव टिकण्यामागे प्रमुख राजकीय नेत्यांची मान्यता आणि त्यांनी सभागृहाबाहेर केलेली मोर्चेबांधणी ही कारणे असावीत.

फाळणीच्या जखमा घेऊन स्वतंत्र झालेल्या भारताच्या नेतृत्वाने सुरुवातीच्या काळात जास्तीची सावधानता बाळगणे हे स्वाभाविक होते. अनुच्छेद २१ च्या शब्दयोजनेत 'कायद्याद्वारे प्रस्थापित केलेली कार्यपद्धती' हेच अजून असले तरी न्यायालयांचा हस्तक्षेप, जागृत लोकचळवळी आणि राज्यकर्त्यांचा बदलता दृष्टिकोन यामुळे प्रत्यक्ष शब्द न बदलताही 'उचित कायदेशीर प्रक्रिये'चा अवलंब सकारात्मक पद्धतीने आपल्याकडे होत गेला. केशवानंद भारती खटल्यातून संसदेला न बदलता येणारी घटनेच्या मूलभूत चौकटीची संकल्पना आली. मेनका गांधी खटल्याने सरकारी मनमानीला चाप बसून अनुच्छेद २१ अधिक भक्कम झाला. न्यायालयाच्या पुढच्या अनेक निर्णयांनी जगण्याच्या अधिकाराचा अन्न, आरोग्य, रोजगार, माहिती, पारदर्शकता, पर्यावरण इ. विविध बाजूंनी विस्तार झाला. शिक्षणाचा अधिकार मूलभूत अधिकार म्हणून याच अनुच्छेदात समाविष्ट करण्याची घटना दुरुस्ती झाली. आजच्या संसदीय राजकीय चौकटीत विषम व शोषक व्यवस्थेला प्रश्न विचारण्याचा, व्यक्तिगत स्वातंत्र्याचे विविध पैलू उजागर करण्याचा अवकाश अनुच्छेद २१ मुळेच आज आपल्याला उपलब्ध आहे.

# डॉ. अजित रानडे यांना हटवण्याची प्रक्रिया 'वेगवान'; प्रभारी कुलगुरूंचीही नियुक्ती

पुणे : विख्यात अर्थतज्ज्ञ डॉ. अजित रानडे यांच्याबाबत असलेल्या आक्षेपांची पडताळणी करणाऱ्या सत्यशोधन समितीने संस्थेला भेट दिल्यानंतरच्या २४ तासांतच डॉ. अजित रानडे यांना गोखले राज्यशास्त्र आणि अर्थशास्त्र संस्थेच्या कुलगुरूपदावरून हटवण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे. इतकेच नाही, तर संस्थेचे कुलपती डॉ. बिबेक देबरॉय यांनी दोन दिवसांतच प्रभारी कुलगुरूंचीही नियुक्ती केली आहे. कुलगुरूपदासाठी आवश्यक पात्रता नाही, अनावश्यक पदनिर्मिती करून आर्थिक अनियमितता केली, असे आरोप करून डॉ. रानडे यांना विरोध करण्यात आला होता. त्याबाबतच्या तक्रारी गोखले संस्थेचे तत्कालीन कुलपती डॉ. राजीव कुमार, तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाकडे (यूजीसी) करण्यात आल्या होत्या. डॉ. राजीव कुमार यांनी डॉ. रानडे यांना त्या अनुषंगाने कारणे दाखवा नोटीसही बजावली होती. त्यानंतर संस्थेच्या कुलपतीपदी डॉ. बिबेक देबरॉय यांची नियुक्ती झाली. त्यांनी सत्यशोधन समिती स्थापन केली. त्या समितीमध्ये दिल्लीच्या जवाहरलाल नेहरू विद्यापीठाच्या (जेएनयू) कुलगुरू डॉ. शांतिश्री पंडित, टाटा समाजविज्ञान संस्थेचे प्रा. अनिल सुतार, नागपूर-एम्सचे डॉ. सिद्धार्थ दुभाषी यांचा समावेश होता. या समितीने गोखले संस्थेला शुक्रवारी भेट दिली. या भेटीनंतर त्यांनी शिफारशी केल्या. समितीच्या भेटीनंतर लगेचच २४ तासांतच शनिवारी (१४ सप्टेंबर) कुलपतींनी डॉ. रानडे यांना हटवण्याबाबतचे पत्र दिले. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर अर्थतज्ज्ञ म्हणून विख्यात असलेले डॉ. रानडे यांच्याबाबतच्या या कार्यवाहीवर शिक्षण, संशोधनाच्या क्षेत्रातून टीका करण्यात येत आहे.

डॉ. रानडे यांना हटविल्यानंतर डॉ. देबरॉय यांनी तातडीने प्रभारी कुलगुरूंचीही नियुक्ती केली आहे. यूजीसीच्या नियमानुसार विद्यापीठात प्र-कुलगुरू उपलब्ध नसल्यास कुलपती सर्वांत ज्येष्ठ प्राध्यापकाची कुलगुरू म्हणून नियुक्ती करतील, नवीन कुलगुरूंची नियुक्ती होईपर्यंत ते कुलगुरूंच्या जबाबदाऱ्या निभावतील अशी तरतूद आहे. त्याप्रमाणे प्रा. दीपक शाह यांना विनंती केली असता, त्यांनी नकार दिला. त्यामुळे टाटा समाजविज्ञान संस्थेचे प्र-कुलगुरू प्रा. शंकर दास यांची २२ सप्टेंबरपासून प्रभारी कुलगुरू म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. प्रा. दास यांना अंतरिम कुलगुरूपदाची जबाबदारी स्वीकारण्यात कोणतीही अडचण येणार नाही, याबाबत व्यवस्थापन मंडळासह सर्व संबंधितांनी योग्य ती कार्यवाही करण्याचेही निर्देश डॉ. देबरॉय यांनी दिले आहेत.

# गुंगीचे इंजेक्शन देऊन शाळकरी मुलीवर अत्याचार; शाळेतील तक्रार पेटीमुळे अत्याचाराला वाचा

पुणे : नात्यातील एका मुलीला गुंगीचे औषध असलेले इंजेक्शन देऊन तिच्यावर अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. याप्रकरणी बंडगार्डन पोलिसांनी एका तरुणाला अटक केली असून आरोपी मुलीच्या नात्यातील आहे. याबाबत पीडित मुलीच्या आईने बंडगार्डन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. आरोपी २१ वर्षीय तरुण मुलीच्या नात्यातील आहे. मुलीच्या दंडावर गुंगीचे औषध असलेले इंजेक्शन आरोपीने दिले. मुलगी बेशुद्ध पडल्यानंतर तिची छायाचित्रे काढली. समाज माध्यमात छायाचित्रे प्रसारित करण्याची धमकी देऊन आरोपीने तिच्यावर अत्याचार केले. संबंधित प्रकाराची कोणाला माहिती दिल्यास धमकी दिली. मी जेव्हा भेटायला बोलावेल. तेव्हा यायचे, अशी धमकी आरोपीने मुलीला दिल्याचे तिच्या आईने फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस उपनिरीक्षक काळे तपास करत आहेत.

बारामतीतील दोन मुलींना पुण्यात बोलावून त्यांच्यावर सामुहिक अत्याचार करण्यात आल्याची घटना नुकतीच घडली होती. याप्रकरणी बारामती तालुका पोलिसांनी तिघांना अटक केली होती. अखेर वाचा फुटली पीडीत मुलगी एका शाळेत शिक्षण घेत आहे. आरोपी मुलीच्या नात्यातील आहे. याप्रकाराची माहिती वडिलांना दिल्यास ते चिडतील. वाद होतील. त्यामुळे मुलीने या प्रकाराची माहिती कुटुंबीयांना दिली नव्हती. अत्याचारांच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर शहरातील विविध शाळांमध्ये तक्रार पेट्या बसविण्यात आल्या आहेत. मुलीने तिच्यावर गुदरलेल्या प्रसंगाची माहिती अर्जात लिहिली होती. मुलीने तक्रार पेटीत अर्ज टाकला. शालेय प्रशासनाने तिचा अर्ज पाहिला. त्यानंतर या घटनेची माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी मुलीच्या नात्यातील २१ वर्षीय तरुणाला अटक केली असून, त्याच्याविरुद्ध बलात्कार, तसेच बालकांचे लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण कायद्यान्वये गुन्हा दाखल केला.

# शिक्षक आक्रमक, व्हॉट्सअ‍ॅप समुहांतून बाहेर

पुणे : राज्याच्या शालेय शिक्षण विभागाच्या निर्णयांना विरोध दर्शवण्यासाठी राज्यभरातील प्राथमिक शिक्षकांच्या संघटनांनी आंदोलनाची भूमिका घेतली आहे. त्यानुसार असहकाराच्या भूमिकेतून शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांचा समावेश असलेल्या व्हॉट्सअ‍ॅप समूहांतून शिक्षक बाहेर पडू लागले आहेत.

प्राथमिक शिक्षक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांच्या पुण्यात झालेल्या बैठकीत राज्य शासनाने संचमान्यता, कंत्राटी पद्धतीने भरती, आधार कार्ड आधारित शिक्षक निश्चिती या बाबतचे निर्णय रद्द करण्याच्या मागणीसाठी राज्यभरातील प्राथमिक शिक्षकांच्या संघटनांनी प्रशासनाला सहकार्य न करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार मंगळवारपासून (१७ सप्टेंबर) शिक्षकांनी काळी फीत लावून विरोध प्रदर्शित करणे, १८ सप्टेंबरपासून व्हॉट्सअ‍ॅपवरील कथित प्रशासनिक समुहातून बाहेर पडून असहकार करणे, २५ सप्टेंबर रोजी सर्व शिक्षकांनी रजेवर जाऊन प्रत्येक जिल्ह्यात मोर्चा काढणे अशाप्रकारे आंदोलन करण्याचे निश्चित करण्यात आले होते. त्यानुसार शिक्षकांनी व्हॉट्सअ‍ॅप समूह सोडण्यास सुरुवात केली आहे. महाराष्ट्र राज्य प्राथमिक




शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे म्हणाले, की शिक्षण विभागातील अधिकारी व्हॉट्सअ‍ॅप समुहांद्वारे शिक्षकांकडून विविध प्रकारची माहिती मागवत असतात. त्यामुळे शिक्षक, अधिकाऱ्यांचे विविध व्हॉट्सअ‍ॅप समूह आहेत. मात्र आता आंदोलनाच्या भूमिकेतून राज्यभरातील शिक्षक संबंधित व्हॉट्सअ‍ॅप समूह सोडत आहेत. २५ सप्टेंबर रोजी शिक्षकांच्या रजा आंदोलनाचीही दिशा ठरवण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली. प्रशासनाकडून व्हॉट्सअ‍ॅप समुहांद्वारे अनावश्यक माहिती वारंवार मागवली जाते. त्यामुळे अध्यापनाच्या कामात व्यत्यय येतो. शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यासाठी 'शिक्षकांना शिकवू द्या' असे म्हणण्याची वेळ आली आहे. तंत्रज्ञान झपाट्याने प्रगती करत असताना तरुण उमेदवारांना संधी देण्याऐवजी शासन सेवानिवृत्त शिक्षक नियुक्त करत आहे. यातून काय साध्य होणार आहे?

# विसर्जन मिरवणुकीत नाचताना झालेल्या वादातून तरुणांवर शस्त्राने वार; पोलिसांकडून ३ गुन्हे दाखल

पुणे : विसर्जन मिरवणुकीत नाचताना झालेल्या वादातून तरुणावर चाकूने वार करण्यात आल्याची घटना टिळक रस्त्यावर घडली. याप्रकरणी एकाविरुद्ध खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी स्वारगेट पोलिसांनी गुन्हा दाखल केला. भवानी पेठेतील कासेवाडी, तसेच लक्ष्मीनारायण चित्रपटगृह चौक परिसरात दोन जणांवर वार करण्यात आले.

कुणाल परमेश्वर बनसोडे (वय २३, रा. चंदन हॉस्पिटलसमोर, डायस प्लॉट, गुलटेकडी) असे गंभीर जखमी झालेल्याचे नाव आहे. स्वप्नील मंगेश मोरे (वय २३, रा. चंदन हॉस्पिटलसमोर, डायस प्लॉट, गुलटेकडी) याने याबाबत स्वारगेट पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्याने दिलेल्या फिर्यादीनुसार, एका अनोळखी तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कुणाल आणि स्वप्नील टिळक रस्त्यावर विसर्जन मिरवणुकीत नृत्य करत होते. त्यावेळी गर्दीत धक्का लागल्याने एका अनोळखी तरुणाबरोबर मोरे आणि बनसोडेचा वाद झाला. त्यानंतर बनसोडेला आरोपीने गर्दीतून बाहेर ओढले. त्याला शिवीगाळ केली. बनसोडेचा मित्र मोरेने मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला. अनोळखी तरुणाने बनसोडेच्या पोटावर चाकूने वार केले. पोलीस उपनिरीक्षक राठोड तपास करत आहेत.

भवानी पेठेतील कासेवाडी भागात मिरवणुकीत किरकोळ वादातून एका तरुणावर कोयत्याने वार करण्यात आले. निखिल अविनाश चौधरी (वय २५, रा. भगवा चौक, कासेवाडी) असे जखमी झालेल्याचे नाव आहे. याप्रकरणी जईद तांबोळी, बिलाल खान, लतीफ शेख, चुव्वा यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

निखिल कासेवाडीतील राजीव गांधी मित्र मंडळाच्या मिरवणुकीत नाचत होता. त्यावेळी झालेल्या वादातून निखिल याच्यावर कोयत्याने वार करण्यात आले. पोलीस निरीक्षक विटे तपास करत आहेत.

स्वारगेट परिसरातील लक्ष्मीनारायण चित्रपटगृहाजवळ मिरवणुकीत नाचताना झालेल्या वादातून एका तरुणाला बेदम मारहाण करण्यात आली. त्याच्या डोक्यात कठीण वस्तूने प्रहार करण्यात आला. मनोज नाथ मिझार (वय २३, रा. मुकुंदनगर, स्वारगेट) असे जखमी झालेल्याचे नाव आहे.

याप्रकरणी मोहन भगत सोनार आणि राकेश भगत सोनार (दोघे रा. मुकुंदनगर, स्वारगेट) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत मिझारने स्वारगेट पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. मिझार लक्ष्मीनारायण चित्रपटगृहाजवळील चौकात पृथ्वी मंडळाच्या मिरवणुकीत नाचत होता. त्यावेळी किरकोळ वादातून मिझारला शिवीगाळ करुन सोनार यींनी मारहाण केली. मिझारच्या डोक्यात कठीण वस्तूने प्रहार करण्यात आला. पोलीस उपनिरीक्षक राठोड तपास करत आहेत.

# १४ वाहनांची तोडफोड करणाऱ्या 'त्या' आरोपींची पोलिसांनी काढली धिंड

पिंपरी-चिंचवड : दहशत पसरविण्यासाठी पिंपळे गुरव येथील मयूर नगरी जवळ दोन तरुणांनी १४ वाहनांची तोडफोड केली होती. दोन्ही आरोपींना अटक केल्यानंतर मंगळवारी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास घटनास्थळी घेऊन जात परिसरातून धिंड काढण्यात आली. शशिकांत दादाराव बनसोडे आणि प्रथमेश अरूण इंगळे अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.

पिंपळे गुरव आणि नवी सांगवीत दहशत माजविण्यासाठी दोन तरुणांनी १४ वाहनांची तोडफोड केली होती. तसेच, पत्ता न सांगितल्याने गतिमंद तरुणावर कोयत्याने वार करून त्याला जीवे मारण्याचा प्रयत्न केला होता. ही घटना रविवारी पहाटे चारच्या सुमारास घडली होती. सांगवी पोलिसांनी दोन्ही आरोपींना काही तासांतच जेरबंद केले.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चार- पाच दिवसांपूर्वी पिंपळे गुरव येथील मयुरनगरी हाउसिंग सोसायटीजवळ लाला पाटील आणि त्याच्या साथीदारांनी दोन जणांवर जीवघेणा हल्ला केल्याची घटना घडली होती. या घटनेचा बदला घेण्यासाठी आरोपी बनसोडे व इंगळे हे पहाटे चारच्या सुमारास लाला पाटील याचा शोध घेत होते. यावेळी राजेश हा घराबाहेर उभा असताना आरोपींनी त्याला लाला पाटील याचा पत्ता विचारला. मात्र, त्याने पत्ता न सांगितल्याने तसेच त्याने कारच्या काचा फोडताना पाहिल्याने आरोपींनी राजेशवर कोयत्याने वार करून त्याला जीवे मारण्याचा प्रयत्न केला होता.

या प्रकारानंतर आरोपी बनसोडे व इंगळे यांनी आपला मोर्चा मयूर नगरीकडे वळविला. जाताना रस्त्यात दिसतील त्या वाहनांवर कोयत्याने मारून काचा फोडल्या होत्या. तसेच कोयते हवेत फिरवत दहशत माजवत आरोपी पसार झाले होते. घटनेची माहिती मिळताच सांगवी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. तोडफोडीच्या प्रकाराचा परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे सांगवी पोलिसांनी तपास करीत काही तासांतच आरोपींच्या मुसक्या आवळल्या होत्या.



## उन्हामुळे विसर्जन मिरवणुकीत नागरिकांना त्रास

पुणे : गणेश विसर्जन मिरवणुकीच्या काळात नागरिकांना वेळीच वैद्यकीय उपचार करण्याची व्यवस्था विघ्नहर्ता न्यासतर्फे करण्यात आली आहे. ऊन आणि प्रचंड गर्दीमुळे नागरिकांना त्रास होत असून गेल्या चार तासांत १२२ नागरिकांवर उपचार करण्यात आले आहेत.विघ्नहर्ता न्यास तर्फे दरवर्षी गणेश विसर्जन मिरवणूक मार्गावर नागरिकांना वेळीच वैद्यकीय उपचार मिळावेत, यासाठी व्यवस्था करण्यात येते.

यावर्षीही व्यवस्था करण्यात आली आहे. यंदाच्या गणेश विसर्जन मिरवणुकीमध्ये पाऊस नसल्यामुळे सकाळपासून कडक ऊन पडले आहे. तसेच गर्दीचे प्रमाणही वाढले आहे. मानाच्या गणपतीची विसर्जन मिरवणूक सुरू झाली असून सकाळपासूनच लक्ष्मी रस्त्यावर नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली आहे.

ऊन आणि गर्दी यामुळे काही नागरिकांना त्रास झाल्याचे प्रकार घडले. गर्दीमुळे पहिल्या चार तासांतच १२२ लोकांना आपत्कालीन वैद्यकीय मदत पुरवावी लागली असल्याचे विघ्नहर्ता न्यासचे विश्वस्त डॉ. मिलिंद भोई यांनी सांगितले.

# आंदेकर खून प्रकरणातील २१ आरोपींवर मोक्का कारवाई



### अनेक प्रयत्न फसले..!

*वनराज यांच्यावर सोमा गायकवाड याच्या टोळीने अनेकवेळा हल्ला करण्याचा प्रयत्न केला. पण, तो काही ना काही कारणांनी फसत होता. शेवटी १ सप्टेंबर रोजी हल्ला केला. दरम्यान, आरोपींनी एकत्रित पैसे जमाकरून शस्त्रसाठा आणला होता. ते वनराज यांच्यावरच पाळत ठेवून होते. वनराजच आंदेकर टोळीची 'सपोर्ट सिस्टीम' आहे, असा समज घेऊन त्यांना वनराज यांचा खून केला. त्यात आर्थिक पुरवठा, निखील आखाडेच्या आरोपींचे न्यायालयीन कामकाजासाठी लागणारा पैसा व इतर गोष्टी यामुळे हा खून झाल्याचेही समोर आले आहे.*

पुणे : माजी नगरसेवक वनराज सूर्यकांत आंदेकर (वय ४०) यांच्या खूनप्रकरणातील तब्बल २१ आरोपींवर पुणे पोलिसांनी मोक्कानुसार (महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी प्रतिबंधक कायदा) कारवाई केली आहे. सोमा गायकवाड टोळीचा म्होरक्या असून, यामध्ये तीन अल्पवयीन मुलांसह वनराज यांच्या बहिणीचा आणि तिच्या पतीचा समावेश आहे.

टोळी प्रमुख कुख्यात गुन्हेगार सोमा ऊर्फ सोमनाथ सयाजी गायकवाड (रा. आंबेगाव पठार) तसेच संजीवनी जयंत कोमकर (रा. ३०९, नाना पेठ) जयंत लक्ष्मण कोमकर (वय ५२), भाचा प्रकाश जयंत कोमकर, गणेश लक्ष्मण कोमकर (३७), अनिकेत दूधभाते, तुषार उर्फ आबा कदम, सागर पवार, सॅम ऊर्फ समीर काळे, आकाश म्हस्के, संगम वाघमारे यांच्यासह १८ जणांना अटक तर, तीन अल्पवयीन मुलांना पोलिसांनी ताब्यात घेतले. समर्थ पोलिसांत वनराज यांचे वडील सूर्यकांत ऊर्फ बंडू राणूजी आंदेकर (वय ६८) यांनी तक्रार दिली आहे.

वनराज आणि संजीवनी बहिण भाऊ आहेत. जयंत कोमकर हा संजीवनी हिचा पती आहे. तर गणेश कोमकरचे आंदेकरच्या सर्वात धाकट्या मुलीशी लग्न झालेले आहे.

वनराजचे सख्खे मेव्हणे आहेत. तर, प्रकाश हा सख्खा भाचा आहे. त्यांच्यात आर्थिक वाद होते.

घटनेच्या दोन दिवस आधीच संजीवनी यांच्या दुकानावर अतिक्रमणबाबत कारवाई झाली होती. कारवाई वनराज यांच्या सांगण्यावरून केल्याचा संशय संजीवनीला होता. त्याचा राग त्यांच्या मनात धरून १ सप्टेंबर रोजी वनराज हे घराजवळ चुलत भाऊ शिवम याच्यासोबत उभारले असताना त्यांच्यावर गोळ्या झाडून आणि कोयत्याने वार करून खून केला होता. यानंतर पोलिसांनी एकूण १८ जणांना अटक केली. तर, ८ पिस्तूल तसेच १३ जिवंत काडतूसे, मोटार आणि ७ दुचाकी जप्त केल्या आहेत.

खून आर्थिक वाद, कौटुंबिक वादासोबतच एक वर्षापूर्वी झालेल्या निखिल आखाडे यांच्या खूनाचा बदला घेण्यासाठी झाल्याचे तपासात समोर आले आहे.

## 'चिंचवड भाजपमध्ये केवळ घराणेशाही', माजी नगरसेवकाचा राजीनामा

पिंपरी : शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या कार्यपद्धतीवर आक्षेप घेत पिंपळेनिलख परिसराचे माजी नगरसेवक संदीप कस्पटे यांनी भाजपच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. चिंचवड विधानसभा क्षेत्रात पक्षात लोकशाही नसून केवळ घराणेशाही असल्याचा आरोप त्यांनी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना पाठविलेल्या पत्रात केला आहे.

महापालिकेच्या २०१७ च्या निवडणुकीत पिंपळेनिलख, वाकड प्रभागातून कस्पटे हे भाजपच्या चिन्हावर पहिल्यांदा विजयी झाले. गेल्या काही दिवसांपासून ते नाराज होते. शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या कार्यपद्धतीवर त्यांचा आक्षेप होता. अखेरीस त्यांनी राजीनामा दिला आहे. निष्ठावंत कार्यकर्त्यांना जबाबदारी द्यायचे सोडून सापत्न वागणूक दिली जात आहे. ताकतवर कार्यकर्त्यांचे खच्चीकरण केले जाते. पोटनिवडणुकीत अश्विनी जगताप यांच्यासाठी कार्यकर्त्यांनी जीवाचे रान




करून प्रभागात मताधिक्य दिले.

पक्षाने भाजप शहराध्यक्षपदी शंकर जगताप यांना बसविले. परंतु, पक्षाची कार्यकारिणी करताना त्यांनी ताकतवर माजी नगरसेवक कार्यकर्त्यांना जाणून-बुजून बाजूला ठेवले. चिंचवड विधानसभेत पक्षात लोकशाही नसून घराणेशाही आहे. मी शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या कार्यपद्धतीला वैतागून भारतीय जनता पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा देत आहे. माझ्यासारखे अनेक माजी नगरसेवक घराणेशाहीला, हुकुमशाहीला कंटाळले आहेत. आणखी १५ माजी नगरसेवक राजीनाम देण्याच्या तयारीत असल्याचे कस्पटे यांनी पत्रात म्हटले आहे. दरम्यान, याबाबत शंकर जगताप यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही. दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून पिंपरी-चिंचवड शहर भाजपमधील गटबाजीला उधाण आले आहे.

महापालिकेत भाजपची सत्ता असताना महत्त्वाच्या पदापासून डावलल्यामुळे यापूर्वी भाजपकडून निवडून आलेले चिंचवड विधानसभा मतदारसंघातील तुषार कामठे, माया बारणे, भाजप संलग्न कैलास बारणे यांनी भाजपचा राजीनामा देत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. आता आगामी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर माजी नगरसेवक संदीप कस्पटे यांनी भाजपला सोडचिठ्ठी दिली आहे. आगामी काळात आणखी काही माजी नगरसेवक भाजपला रामराम करण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## विसर्जनाच्या धामधुमीत वाकड मध्ये गोळीबार? पोलीस उपायुक्त



पिंपरी : शहरात गणपती विसर्जनाची धामधूम सुरू असताना वाकड परिसरात एका अज्ञाताने हवेत गोळीबार केल्याची घटना घडली आहे. पिंपरी-चिंचवड शहरात गणपती विसर्जन मिरवणूक सुरू आहे.

पिंपरी आणि चिंचवड परिसरातील गणरायाला निरोप दिला जात आहे. त्यातच वाकड परिसरात काही वेळापूर्वी अज्ञाताने हवेत गोळीबार केल्याची घटना घडली. गोळीबार झाल्याबाबत एका व्यक्तीने पोलीस नियंत्रण कक्षाला फोनद्वारे ही माहिती दिली. वाकडमधील विकास आराखड्यातील रस्त्यावर पांढर्या मोटारीतून येऊन एका व्यक्तीने हवेत गोळीबार केल्याबाबत माहिती मिळाली. वाकड पोलीस घटनास्थळी दाखल झाले. अधिक माहिती घेऊन कारवाई करीत असल्याचे पोलीस उपायुक्त विशाल गायकवाड यांनी सांगितले.

# अखेर भाजपा नेते बापूसाहेब पठारे यांचा शरद पवार गटात प्रवेश

पुणे : आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुती आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या बैठका, मेळावे सुरू आहेत. उमेदवाराबाबत चाचपणी करण्यात येत आहे. तर लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचे सर्वाधिक उमेदवार निवडून आल्याने जी नेतेमंडळी महायुतीमध्ये जाऊ इच्छित होती त्यातील बहुतांश नेतेमंडळी महाविकास आघाडीच्या मार्गावर असल्याचे दिसत आहे.

गणेशोत्सवादरम्यान अनेक राजकीय पक्षांच्या नेत्यांनी गणेश मंडळांना भेट दिली. भाजपाचे नेते माजी आमदार बापूसाहेब पठारे यांनी वडगावशेरी मतदारसंघातील एका गणेश मंडळात नागरिकांशी संवाद साधत असताना, आगामी विधानसभा निवडणूक लढविणार आहोत आणि तुतारीकडून (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार) निवडणूक लढविणार आहे. त्यामुळे आपल्या भागात असलेल्या नातेवाईक, मित्रमंडळ यांना सांगा की, तुतारीला मतदान करावे, असे आवाहन केले होते. त्यांच्या संवादाचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. त्यानंतर बापूसाहेब पठारे नेमके कधी शरद पवार गटात प्रवेश करतील या चर्चांना उधाण आले होते.

आज अनंत चतुर्दशीला मुहूर्त गाठत भाजपाचे नेते माजी आमदार बापूसाहेब पठारे यांनी थेट मुंबई गाठून शरद पवार यांच्या सिल्वर ओक येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात जाहीर प्रवेश केला. पक्षप्रवेशावेळी माजी नगरसेवक महेंद्र पठारे, माजी नगरसेवक भय्यासाहेब जाधव हे उपस्थित होते. शरद पवार गटात बापूसाहेब पठारे यांनी प्रवेश केल्याने आगामी विधानसभा निवडणुकीत वडगावशेरी मतदारसंघातून शरद पवार गटातून त्यांना उमेदवारी निश्चित मानली जात आहे.

अजित पवार गटाचे सुनील टिंगरे हे या मतदारसंघाचे आमदार आहेत. सद्या या मतदारसंघात महायुतीकडून मोठ्या प्रमाणावर इच्छुक आहेत. त्यामुळे आता महायुतीकडून अजित पवार गटाला की भाजपाला हा मतदारसंघ सोडला जातो? हे पाहावे लागणार आहे.

